नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ रे Year - 4rd | अंक - ७९ Issue - 79 | वार - बुधवार दि. १२ ऑगस्ट २०२६ Blow- Wednesday Date 12 AUGUST 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## 'वंदे मातरम्'ला राष्ट्रगीताप्रमाणेच कायदेशीर संरक्षण; राष्ट्रपतींची मंजुरी

### ऐतिहासिक विधेयकाचे कायद्यात रूपांतर



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली: राष्ट्रीय गीत 'वंदे मातरम्'चा अवमान करणाऱ्यांवर आता कठोर कारवाई केली जाणार आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी मंगळवारी 'राष्ट्रीय प्रतिष्ठा अवमान निवारण (सुधारणा) विधेयक २०२६' ला मंजुरी दिली आहे. या ऐतिहासिक निर्णयामुळे आता राष्ट्रीय गीत असलेल्या 'वंदे मातरम्'ला राष्ट्रगीत 'जन-गण-मन'प्रमाणेच समान कायदेशीर संरक्षण प्राप्त झाले आहे. संसदेने गेल्या महिन्यात 'राष्ट्रीय प्रतिष्ठा अवमान निवारण कायदा, १९७१' मध्ये सुधारणा करणारे हे महत्त्वपूर्ण विधेयक बहुमताने मंजूर केले होते. राष्ट्रपतींच्या स्वाक्षरीनंतर आता या विधेयकाचे कायद्यात रूपांतर झाले असून संपूर्ण देशात हा नियम लागू झाला आहे. कायद्यानुसार, 'वंदे मातरम्'चे गायन रोखणे किंवा गायन चालू असताना त्यात अडथळा निर्माण करणे हा गंभीर गुन्हा मानला जाईल. असा गुन्हा करणाऱ्या व्यक्तीला ३ वर्षांपर्यंतचा कारावास, दंड, किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात. : जर एखाद्या व्यक्तीने हा गुन्हा पुन्हा केला, तर त्याला किमान १ वर्षाच्या कारावासाची तरतूद करण्यात आली आहे. याआधी १९७१ च्या मूळ कायद्यात केवळ राष्ट्रगीत 'जन-गण-मन'च्या अवमानाबाबतच शिक्षेची तरतूद होती. 'वंदे मातरम्'ला राष्ट्रीय गीताचा दर्जा असूनही असा कोणताही थेट कायदेशीर आधार उपलब्ध नव्हता. हीच त्रुटी दूर करण्यासाठी केंद्र सरकारने कलम ३ मध्ये सुधारणा करून 'वंदे मातरम्'चा यामध्ये समावेश केला आहे.

विधेयकात २४ जानेवारी १९५० रोजी घटना समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी दिलेल्या ऐतिहासिक निर्णयाचा विशेष उल्लेख करण्यात आला आहे. भारतीय स्वातंत्र्यलढ्यात बंकीमचंद्र चट्टोपाध्याय लिखित 'वंदे मातरम्' या गीताने अतुलनीय योगदान दिले होते. म्हणूनच, 'वंदे मातरम्'ला राष्ट्रगीत 'जन-गण-मन'सारखाच दर्जा आणि सन्मान दिला गेला पाहिजे, अशी भूमिका घटना समितीने मांडली होती. कायद्यातील या सुधारणेमुळे घटना समितीच्या भूमिकेला आज कायदेशीर बळ मिळाले आहे. यावर्षीच्या स्वातंत्र्यदिनी पहिल्यांदाच लाल किल्ल्याच्या तटबंदीवरून 'वंदे मातरम्'चे गायन केले जाणार आहे. अधिकृत कार्यक्रमांमध्ये 'वंदे मातरम्'ची सर्व ६ कडवी गायली जातील. यासाठी ३ मिनिटे १० सेकंदांचा कालावधी निश्चित करण्यात आला आहे. कोणत्याही शासकीय कार्यक्रमात राष्ट्रगीत (जन-गण-मन) आणि राष्ट्रीय गीत एकत्र वाजवले किंवा गायले जाणार असल्यास, 'वंदे मातरम्' प्रथम गायले जाईल. राष्ट्रीय गीत सुरू असताना उपस्थितांना सावध स्थितीत उभे राहणे बंधनकारक असेल. देशातील सर्व शाळांमध्ये दैनंदिन कामकाजाची सुरुवात 'वंदे मातरम्'च्या समूहगायनाने करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

## पोलिसांच्या दडपशाहीविरोधात झारखंड बंद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

रांची : झारखंडमध्ये स्पर्धा परीक्षांमधील कथित अनियमिततेविरोधात निदर्शने करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या पोलीस कारवाईचे तीव्र पडसाद संपूर्ण राज्यात उमटत आहेत. विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित पोलीस दडपशाहीचा निषेध करत भारतीय जनता पक्षाने (भाजप) पुकारलेल्या राज्यव्यापी 'झारखंड बंद'मुळे जनजीवन विस्कळीत झाले. दुसरीकडे, झारखंडच्या विविध भागांत भाजपने रस्ते अडवून चक्का जाम केला असून, जुन्या विधानसभेजवळ निदर्शने करणाऱ्या अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या २०० हून अधिक कार्यकर्त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

झारखंड लोकसेवा आयोग आणि झारखंड कर्मचारी निवड आयोगच्या परीक्षांमधील कथित अनियमितता, जेएसएससी- सीजीएल परीक्षा तातडीने रद्द करणे आणि संपूर्ण प्रकरणाची केंद्रीय अन्वेषण ब्युरोमार्फत निष्पक्ष चौकशी करणे, या प्रमुख मागण्यांसाठी विद्यार्थी आणि परीक्षार्थी गेल्या काही दिवसांपासून तीव्र आंदोलन करत आहेत. याच आंदोलनाचा भाग म्हणून सोमवारी विद्यार्थ्यांनी 'विधानसभा घेराव' मोर्चा काढला होता. मात्र, नवीन विधानसभेकडे मार्च काढत असलेल्या या विद्यार्थ्यांवर पोलिसांनी लाठीचार्ज आणि वॉटर कॅननचा (पाण्याचा मारा) वापर केला. या हिंसक कारवाईमध्ये शेकडो विद्यार्थी जखमी झाल्याचा दावा विद्यार्थी संघटनांनी केला आहे. विद्यार्थ्यांवरील लाठीमार आणि पोलिसांच्या अतिरेकाचा तीव्र निषेध करत झारखंड भाजपचे प्रदेशाध्यक्ष आदित्य साहू यांनी हेमंत सोरेन सरकारवर गंभीर आरोप केले आहेत. आमच्या मुलांवर आणि विद्यार्थ्यांवर अन्याय आणि अत्याचार झाले आहेत. नोकऱ्यांची विक्री, पेपरफुटी आणि आमच्या मुलांच्या शरीरावर ज्या प्रकारे लाठ्या चालवण्यात आल्या, त्याविरोधात आणि विद्यार्थ्यांच्या समर्थनात आज भाजप कार्यकर्ते रस्त्यावर उतरून झारखंड बंद ठेवत आहेत, असे आदित्य साहू यांनी सांगितले. मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांच्यावर टीका करताना ते म्हणाले की, हेमंत सोरेन यांनी कधीही गरिबी किंवा संघर्ष अनुभवलेला नाही, त्यामुळेच ते विद्यार्थ्यांशी अशी असंवेदनशील वागणूक करत आहेत. झारखंडचे विरोधी पक्षनेते बाबूलाल मरांडी यांनीही सरकारला धारेवर धरले. ते म्हणाले, गेल्या १५ दिवसांपासून विद्यार्थी धरणे आणि उपोषण करत आहेत. विद्यार्थ्यांची केवळ सीबीआय चौकशीची साधी मागणी असताना, सरकारने त्यांच्यावर बळाचा वापर केला. सरकारने आधीच या प्रकरणी सीबीआय चौकशीचे आदेश दिले असते, तर आज ही वेळ आली नसती. भाजपच्या वतीने पुकारण्यात आलेल्या बंदमुळे झारखंडच्या अनेक जिल्ह्यांमध्ये तणावाचे वातावरण पाहायला मिळाले. कार्यकर्त्यांनी ठिकठिकाणी रस्ते ब्लॉक करून रास्ता रोको केला, ज्यामुळे प्रवाशांना आणि सर्वसामान्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला. दुसऱ्या बाजूला, विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीचार्जविरोधात जुन्या विधानसभेजवळ एबीव्हीपीच्या विद्यार्थी संघटनेने आक्रमक निदर्शने केली. परिस्थिती नियंत्रणाबाहेर जात असल्याचे पाहून पोलिसांनी कठोर पावले उचलली आणि जुन्या विधानसभेजवळ प्रदर्शन करणाऱ्या २०० हून अधिक एबीव्हीपी कार्यकर्त्यांना तातडीने ताब्यात घेतले.

## उजनीतून पंधरा दिवसात ५७ टीएमसी पाणी सोडले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर/प्रतिनिधी : सोलापूर जिल्ह्याची जीवन वाहिनी आणि लाखो शेतकऱ्यांसाठी वरदान ठरलेल्या उजनी धरणाने यंदाच्या पावसाळ्याच्या सुरुवातीला सोलापूरकरांची चिंता वाढवली होती. उजनी धरणाची सुरुवातीला पाण्याची पातळी तब्बल ऊने २७% पर्यंत गेल्याने धरण भरेल का नाही अशी परिस्थिती निर्माण झाली होती. मात्र पुणे मावळ आणि भीमा नदीच्या वरील खोऱ्यामध्ये काही दिवसात झालेल्या दमदार पावसामुळे उजनीच्या पाणलोट क्षेत्रात चित्र बदलून टाकले.

अवघ्या पंधरा उजनीच्या दिवसातपाणीपातळीमध्ये पाण्या पातळीमध्ये झपाट्याने वाढ झाली आणि शंभर टक्के धरण भरले त्यामुळे सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळालेला आहे. त्याच काळात उजनीतून सत्ता टीएमसी पाणी भीमा नदी पात्रात सोडलेले आता उजनीच्या पाण्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

धरण भरले की आनंदाची बाब असली तरी निसर्गाने उपलब्ध करून दिलेल्या पाण्याच्या सोलापूर जिल्हा कीर्ती प्रभावी वापर झाला किती पाणी शेतीसाठी वापरण्यात आली. किती पाणी नदी पत्रातून वाहून गेले. याचा हिशोब करण्याची गरज निर्माण झाली आहे.

सुरुवातीला उजनी धरणाची पातळी ऊने २७% शेतकऱ्यांमध्ये वाढली होती चिंता.

यंदाच्या पावसाळी ला सुरुवातीला उजनी धरण मृत्यू साठ्यात गेले होते. पाणी पातळी ऊने २७% पर्यंत खाली गेल्याने. सोलापूर जिल्ह्यातील शेतकरी चिंतेत होते. उजनी धरती जिल्ह्यातील मोठ्या प्रमाणावर शेती सिंचनासाठी अवलंबून आहे. याशिवाय सोलापूर शहरासह अनेक शहरांची गावांची पिण्याची पाणी व औद्योगिक गरजाही उजनीच्या पाण्यावर अवलंबून आहेत. उडीसा उजनी धरणामध्ये पाणीसाठा झाला नाही तर खरीप हंगाम साय आणि रब्बी हंगामावरील परिणाम होतो. उजनी धरण हे केव्हा धरणाची बाब असून सोलापूर जिल्ह्याची अर्थव्यवस्थेची जोडलेली बाब आहे.

## बावनकुळेंना टार्गेट करणं योग्य नाही, कोणाचंही प्रमाणपत्र रद्द केलेलं नाही, जरांगे पाटलांच्या टिकेनंतर मुख्यमंत्र्यांचं मोठं वक्तव्य

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मराठा आरक्षणाचे उपोषणकर्ते मनोज जरांगे पाटील हे सध्या पश्चिम महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आहेत. मराठा आरक्षण आणि जात प्रमाणपत्राच्या संदर्भाने त्यांचा दौरा सुरु आहे. यावेळी मनोज जरांगे पाटील सरकारसह मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यावर जोरदार टीका करत आहेत. बावनकुळे आमची कुणबी प्रमाणपत्र रद्द करत असल्याचा आरोपा देखील जरांगे पाटलांनी केलाय. यावर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे. चंद्रशेखर बावनकुळे यांनी मंत्री म्हणून कर्तव्य केले आहे. त्यांना अशा पद्धतीने टार्गेट करणं योग्य नाही. ओबीसी आहेत म्हणून टार्गेट करणं महाराष्ट्राला शोभणार नाही असेही ते म्हणाले. कोणाचेही प्रमाणपत्र रद्द केलेले नाही, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी दिली.

संविधानाच्या चौकटीत बसत असेल तर न्याय देऊ

सरकार संविधानाने चालते. सर्वांचे म्हणने ऐकूण घेतले जाईल असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, संविधानाच्या चौकटीत बसत असेल तर न्याय देऊ. एकाच्या ताटातले काढून दुसऱ्याला देणार नाही. मराठा, ओबीसी, एससी सर्व समान आहेत असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. ते पुण्यात प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

ऋछउ इकॉसिस्टिम तयार करायची आहे. आज समीटमध्ये चर्चा झालेली आहे. पुणे उद्योगाची राजधानी बनेल असेही ते म्हणाले. चाकण येथील खड्डे संदर्भात इंडस्ट्रीयल टाऊनशिपचा दर्जा दिला जाईल असे ते म्हणाले. पुणे नाशिक रेल्वे संदर्भात चर्चा करून योग्य तो निर्णय घेतला जाईल असे ते म्हणाले. पालघर प्रकल्पासंदर्भात दुग्ध विकास विभागाची जागा संपादित आहे. सर्व जागा मालकाना पैसे दिले आहेत. उदयोगसाठी पोषक वातावरण महाराष्ट्रात तयार करणार आहोत असेही मुख्यमंत्री म्हणाले. १५०० कोटींची गुंतवणूक राज्यात आणण्याचे उद्दिष्ट आहे. रिसर्च अँड डेव्हलपमेंट, जास्तीचा एफएसआय, पायाभूत सुविधा देणार आहोत असेही ते म्हणाले. पुढील १००० दिवसामध्ये अर्टिफिसिअल इंटेलिजन्समुळे नवीन रोजगार निर्मिती होणार आहे. राज्य सरकार विद्यापीठे किंवा केंद्र सरकार या संदर्भात काम करत आहेत. कौशल्य शिक्षणासाठी आपण प्रोत्साहन देत आहोत असे ते म्हणाले. जागतिक पातळीवर सुरु असलेल्या तंत्रज्ञानाचा उपयोग करून कुशल मनुष्यबळ तयार करणार - महाराष्ट्र सरकारने दाओसमध्ये आपण ख आणि डेटा सायन्स मध्ये सामंजस्य करार केले आहेत. आपल्याला नवीन संधी नाशिक नागपूर संभाजीनगर येथे देखील उद्योगासाठी उपलब्ध करून देत आहोत.

### रुग्णवाहिकेपासून उपचारांपर्यंत मदतीचा हात

### विद्यार्थ्यांच्या उपचाराचा खर्चही स्वखर्चाने उचलला...

## बबलाद येथे जीर्ण शाळेची स्लॅब कोसळली; विद्यार्थी जखमी होताच सागर दादांची तातडीची धाव...!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



अक्कलकोट/प्रतिनिधी :

अक्कलकोट तालुक्यातील बबलाद येथे जिल्हा परिषद शाळेची जुनी व जीर्ण इमारतीची स्लॅब कोसळून विद्यार्थ्यांना दुखापत झाल्याची घटना घडली.घटनेची माहिती मिळताच अक्कलकोट पंचायत समितीचे उपसभापती सागर दादा कल्याणशेट्टी यांनी वेळ न दवडता घटनास्थळी धाव घेत जखमी विद्यार्थ्यांची विचारपूस केली आणि परिस्थितीचा प्रत्यक्ष आढावा घेतला.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन सागर दादांनी तातडीने रुग्णवाहिकेची व्यवस्था करून दुखापतग्रस्त विद्यार्थ्यांना दुधनी व मैंदर्गी आरोग्य केंद्रातील डॉक्टर व कर्मचार्यांनी प्रथमोपचार करून विद्यार्थी व शिक्षकाला अक्कलकोट ग्रामीण रुग्णालयात पुढील उपचारासाठी पाठविले. गंभीर दुखापत झालेल्या विद्यार्थ्यांना अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ सुपर स्पेशालिटी रुग्णालयात दाखल करून आवश्यक उपचारांची व्यवस्था करण्यात आली.

**संकटाच्या क्षणी पालकांच्या पाठीशी सागर दादा कल्याणशेट्टी...!**

विद्यार्थ्यांच्या उपचारासाठी लागणारा आर्थिक खर्च हा त्यांच्या कुटुंबीयांसाठी अडचणीचा ठरू नये,यासाठी सागर दादा कल्याणशेट्टी यांनी स्वतः पदरमोड करून उपचाराचा खर्च उचलण्याची जबाबदारी घेतली.संकटाच्या क्षणी केवळ घटनास्थळी उपस्थित राहणे नव्हे,तर जखमी विद्यार्थ्यांना उपचार मिळेपर्यंत प्रत्यक्ष पाठपुरावा करण्याची भूमिका त्यांनी घेतली.

या घटनेनंतर सागर दादांनी शाळेच्या जीर्ण इमारतीची पाहणी करून विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गांभीर्याने घेतला.भविष्यात अशा घटना घडू नयेत यासाठी धोकादायक व जीर्ण शाळा इमारतींचे तातडीने सर्वेक्षण करून आवश्यक दुरुस्ती अथवा नवीन इमारतीची कार्यवाही करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.

**पाहणीपुरते नेतृत्व नाही,संकटात प्रत्यक्ष मदतीला धावणारा चेहरा...**

विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाल्यानंतर प्रशासनाकडून आवश्यक कार्यवाही होणे गरजेचे असतानाच,घटनेच्या क्षणी जखमी विद्यार्थ्यांना तातडीची वैद्यकीय मदत मिळवून देणे आणि त्यांच्या उपचारासाठी आर्थिक मदतीची जबाबदारी स्वीकारणे,या भूमिकेमुळे सागर दादांची चर्चा होत आहे.



राजकारणाच्या पलीकडे जाऊन संकटाच्या प्रसंगी सामान्य कुटुंबांच्या पाठीशी उभे राहणे,हीच लोकप्रतिनिधी म्हणून जबाबदारीची खरी कसोटी... बबलादच्या घटनेत सागर दादांनी ही जबाबदारी प्रत्यक्ष कृतीतून दाखवून दिल्याची भावना ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे..

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

बुधवार दि. १२ ऑगस्ट २०२६


## संपादकीय....

### ऐतिहासिक मंजुरी

राष्ट्रीय गीत 'वंदे मातरम्'चा अवमान करणाऱ्यांवर आता कठोर कारवाई केली जाणार आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी मंगळवारी 'राष्ट्रीय प्रतिष्ठा अवमान निवारण (सुधारणा) विधेयक २०२६' ला मंजुरी दिली आहे. या ऐतिहासिक निर्णयामुळे आता राष्ट्रीय गीत असलेल्या 'वंदे मातरम्'ला राष्ट्रगीत 'जन-गण-मन'प्रमाणेच समान कायदेशीर संरक्षण प्राप्त झाले आहे. संसदेने गेल्या महिन्यात 'राष्ट्रीय प्रतिष्ठा अवमान निवारण कायदा, १९७१' मध्ये सुधारणा करणारे हे महत्त्वपूर्ण विधेयक बहुमताने मंजूर केले होते. राष्ट्रपतींच्या स्वाक्षरीनंतर आता या विधेयकाचे कायद्यात रूपांतर झाले असून संपूर्ण देशात हा नियम लागू झाला आहे. कायद्यानुसार, 'वंदे मातरम्'चे गायन रोखणे किंवा गायन चालू असताना त्यात अडथळा निर्माण करणे हा गंभीर गुन्हा मानला जाईल. असा गुन्हा करणाऱ्या व्यक्तीला ३ वर्षांपर्यंतचा कारावास, दंड, किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात. : जर एखाद्या व्यक्तीने हा गुन्हा पुन्हा केला, तर त्याला किमान १ वर्षाच्या कारावासाची तरतूद करण्यात आली आहे. याआधी १९७१ च्या मूळ कायद्यात केवळ राष्ट्रगीत 'जन-गण-मन'च्या अवमानाबाबतच शिक्षेची तरतूद होती. 'वंदे मातरम्'ला राष्ट्रीय गीताचा दर्जा असूनही असा कोणताही थेट कायदेशीर आधार उपलब्ध नव्हता. हीच त्रुटी दूर करण्यासाठी केंद्र सरकारने कलम ३ मध्ये सुधारणा करून 'वंदे मातरम्'चा यामध्ये समावेश केला आहे. विधेयकात २४ जानेवारी १९५० रोजी घटना समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी दिलेल्या ऐतिहासिक निर्णयाचा विशेष उल्लेख करण्यात आला आहे. भारतीय स्वातंत्र्यलढ्यात बंकीमचंद्र चट्टोपाध्याय लिखित 'वंदे मातरम्' या गीताने अतुलनीय योगदान दिले होते. म्हणूनच, 'वंदे मातरम्'ला राष्ट्रगीत 'जन-गण-मन'सारखाच दर्जा आणि सन्मान दिला गेला पाहिजे, अशी भूमिका घटना समितीने मांडली होती. कायद्यातील या सुधारणेमुळे घटना समितीच्या भूमिकेला आज कायदेशीर बळ मिळाले आहे. यावर्षीच्या स्वातंत्र्यदिनी पहिल्यांदाच लाल किल्ल्याच्या तटबंदीवरून 'वंदे मातरम्'चे गायन केले जाणार आहे. अधिकृत कार्यक्रमांमध्ये 'वंदे मातरम्'ची सर्व ६ कडवी गायली जातील. यासाठी ३ मिनिटे १० सेकंदांचा कालावधी निश्चित करण्यात आला आहे.

# खेडच्या एस.व्ही.आय.टी.मध्ये 'ज्ञानयात्री आदर्श पुरस्कार' वितरण सोहळा संपन्न

## डॉ. बी. पी. रोंगे सरांनी शिक्षण व सामाजिक क्षेत्रात केलेले कार्य कौतुकास्पद : इंद्रजित पवार





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट (स्वेरी) व खेड (ता. उत्तर सोलापूर) येथील स्वामी विवेकानंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (एस.व्ही. आय.टी.) यांच्या संयुक्त विद्यमाने उत्तर सोलापूर व दक्षिण सोलापूर तालुक्यातील शिक्षकांच्या गौरवासाठी 'ज्ञानयात्री आदर्श पुरस्कार' वितरण सोहळा स्वामी विवेकानंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, सोलापूर-बार्शी रोड, खेड येथे उत्साहात संपन्न झाला. या सोहळ्यास दोन्ही तालुक्यांसह जिल्ह्यातून प्रचंड प्रतिसाद मिळाला.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे व उदघाटक म्हणून सोलापूर जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष इंद्रजित पवार हे उपस्थित होते तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्वेरीचे संस्थापक व एस.व्ही. आय.टी., सोलापूरचे अध्यक्ष प्रा. डॉ. बी. पी. रोंगे हे होते. दीपप्रज्वलनानंतर प्रमुख पाहुणे इंद्रजित पवार म्हणाले की, 'शिक्षणतज्ञ डॉ. बी. पी. रोंगे सरांनी शिक्षण व सामाजिक क्षेत्रात केलेले कार्य कौतुकास्पद असून सोलापूर जिल्ह्यात त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचा मोठा ठसा आहे. शिक्षकांच्या कार्याचा सन्मान करून त्यांना पुरस्कार देणे हा अत्यंत प्रेरणादायी उपक्रम आहे. या पुरस्कारांमुळे शिक्षकांना पुढील कार्यासाठी निश्चितपणे नवी ऊर्जा व प्रेरणा मिळेल. डॉ. रोंगे सरांचे कार्य निश्चितच कौतुकास्पद असून विद्यार्थ्यांबरोबरच शिक्षकांच्या विकासात त्यांचे महत्वपूर्ण योगदान आहे. डॉ. रोंगे सर हे प्रत्येक विषयाच्या खोलात जाऊन त्यावर अभ्यास करून धाडसी निर्णय घेताना उज्वल यश कसे मिळेल याकडे अधिक लक्ष देतात.' असे सांगून डॉ. रोंगे सरांच्या कार्यावर प्रकाश टाकला. अध्यक्षस्थानावरून बोलताना प्रा. डॉ. बी. पी. रोंगे यांनी सर्व पुरस्कारार्थींचे अभिनंदन करून म्हणाले की, 'शिक्षण क्षेत्रात प्रामाणिकपणे व समर्पित भावनेने कार्य करणाऱ्या प्राचार्य, मुख्याध्यापक, शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांचा सन्मान करणे ही आमची सामाजिक जबाबदारी आहे. पुरस्कार मिळालेल्या सर्वांनी यापुढेही आपले कार्य अधिक जोमाने व प्रगतीपथावर सुरू ठेऊन विद्यार्थ्यांच्या व समाजाच्या विकासासाठी योगदान द्यावे' अशी अपेक्षा व्यक्त केली. या बहारदार कार्यक्रमास जवळपास ६५० शिक्षक सहभागी झाले होते. यावेळी उत्कृष्ट संस्था, आदर्श महाविद्यालय, आदर्श शाळा, स्वच्छ व सुंदर माझी शाळा, आदर्श प्राचार्य, आदर्श मुख्याध्यापक, आदर्श शिक्षक, आदर्श शिक्षकेतर कर्मचारी, आदर्श कलाशिक्षक आणि आदर्श क्रीडाशिक्षक अशा विविध विभागातून पुरस्कार प्रदान करण्यात आले. उल्लेखनीय कार्य करणाऱ्या एकूण ११६ पुरस्कारार्थींना मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. यावेळी सोलापूर जिल्हा समाजसेवा मंडळाचे सचिव महादेव कमळे, खजिनदार व्ही. डी. पाटील, संतोष भीमराव पाटील कॉलेज, मंद्रूपचे प्राचार्य डॉ. एम. एन. जगताप, श्री. सावित्रीबाई खडतरे कला व विज्ञान महाविद्यालय, पाकणीचे प्राचार्य प्रा. दत्तात्रय शिंदे, लोकसेवा विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, मंद्रूपचे प्राचार्य बसप्पा घाटे, सिद्धाराम म्हेत्रे प्रशाला, कुंभारीच्या मुख्याध्यापिका सौ. नीलिमा भांगे, श्री. एस. एस. म्हेत्रे, उर्दू हायस्कूल, कुंभारीच्या मुख्याध्यापिका सौ. शेख एम. एन., जी. बी. घोडके विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, नान्नजचे प्राचार्य रमेश अगलदिवटे तसेच एस.व्ही.आय.टी.चे कॅम्पस इनचार्ज डॉ. कीर्ती भोसले, प्राचार्य डॉ. सुतार यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. तब्बल चार तास चाललेल्या या नियोजनबद्ध कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी स्वेरी व एस.व्ही. आय.टी. या दोन्ही संस्थांतील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. प्रा. यादव पनसवाड, प्रा. अरविंद बगले यांच्यासह इतर प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी कार्यक्रमाच्या नियोजनापासून ते अंमलबजावणीपर्यंत विशेष मेहनत घेतली. प्रा. यादव पनसवाड यांनी सूत्रसंचालन करून उपस्थितांचे आभार मानले.

१. शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पदोन्नती, नियुक्ती व सेवा विषयक एकूण ३७ प्रकरणे सोडवली गेली आहेत. त्यामुळे संबंधित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना न्याय मिळाल्या मुळे शिक्षकांच्या वतीने डॉ. बी. पी. रोंगे सरांचा सत्कार केला.

२. पुरस्कार निवडीपासून कार्यक्रम पत्रिका पोहोचेपर्यंत उत्तम नियोजन 'ज्ञानयात्री आदर्श पुरस्कार'साठी शिक्षक व विविध पुरस्कारार्थींची निवड करण्यापासून ते त्यांच्या हातात कार्यक्रमाची पत्रिका पोहोचेपर्यंत निवड समितीने अत्यंत कमी वेळेत उत्तम दर्जाचे नियोजन व कार्य केले. पुरस्कारार्थींची माहिती संकलित करणे, निवड प्रक्रिया, संपर्क साधणे आणि कार्यक्रमाचे नियोजन अशा विविध पातळ्यांवर समितीने केलेल्या कार्यामुळे हा भव्य सोहळा यशस्वीपणे पार पडला.

# युवाशक्ती : राष्ट्रनिर्मितीची नवी दिशा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दरवर्षी १२ ऑगस्ट हा दिवस जगभरात 'आंतरराष्ट्रीय युवा दिन' म्हणून साजरा केला जातो. युवक हे कोणत्याही देशाचे वर्तमान आणि भविष्य घडविणारे सर्वांत महत्त्वाचे घटक मानले जातात. तरुणाईमध्ये असलेली ऊर्जा, कल्पकता, धाडस, परिवर्तनाची आस आणि नव्या वाटा शोधण्याची क्षमता समाजाच्या प्रगतीला नवी दिशा देऊ शकते. त्यामुळे युवा दिन हा केवळ युवकांच्या गौरवाचा दिवस नसून, त्यांच्या प्रश्नांचा, अपेक्षांचा, संधींचा आणि जबाबदाऱ्यांचा गांभीर्याने विचार करण्याचा दिवस आहे. जगातील सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय आणि तांत्रिक परिवर्तनामध्ये युवकांची भूमिका दिवसेंदिवस अधिक महत्त्वाची होत आहे. भारतासारख्या तरुण लोकसंख्या मोठ्या प्रमाणात असलेल्या देशासाठी तर युवाशक्ती ही विकासाची सर्वांत मोठी भांडवलशक्ती आहे. या शक्तीला योग्य शिक्षण, कौशल्य, रोजगार, समान संधी आणि सकारात्मक दिशा मिळाली, तर भारत अधिक सक्षम, समृद्ध आणि न्याय्य राष्ट्र म्हणून जगासमोर उभा राहू शकतो.

आंतरराष्ट्रीय युवा दिनाची सुरुवात युवकांशी संबंधित प्रश्नांकडे जागतिक पातळीवर लक्ष वेधण्यासाठी झाली. संयुक्त राष्ट्रसंघाने युवकांच्या सामाजिक सहभागाला, त्यांच्या हक्कांना आणि विकासातील योगदानाला महत्त्व देत या दिवसाला विशेष स्थान दिले. जगभरातील युवकांना भेडसावणाऱ्या शिक्षण, रोजगार, गरिबी, असमानता, मानसिक ताण, सामाजिक बहिष्कार, हवामान बदल, डिजिटल परिवर्तन आणि शांतता-सुरक्षा यांसारख्या प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी हा दिवस महत्त्वपूर्ण ठरतो. युवकांना केवळ भविष्यातील नागरिक म्हणून पाहण्याऐवजी वर्तमानातील सक्रिय भागीदार म्हणून स्वीकारणे ही काळाची गरज आहे. त्यांच्या मतांना स्थान देणे, निर्णयप्रक्रियेत त्यांचा सहभाग वाढविणे आणि त्यांच्या सर्जनशीलतेला प्रोत्साहन देणे हे आधुनिक लोकशाहीचे महत्त्वाचे लक्षण आहे.

भारताच्या संदर्भात युवकांचे महत्त्व अधिक व्यापक आहे. देशाची मोठी लोकसंख्या तरुण आहे. त्यामुळे भारताकडे जगातील सर्वांत मोठ्या युवा शक्तींपैकी एक शक्ती उपलब्ध आहे. ही लोकसंख्यात्मक स्थिती भारतासाठी मोठी संधी आहे; मात्र ती आपोआप विकासाचे साधन ठरत नाही. युवकांना दर्जेदार शिक्षण, बाजारपेठेला अनुरूप कौशल्ये, रोजगाराच्या संधी, उद्योजकतेसाठी अनुकूल वातावरण आणि सामाजिक सुरक्षितता मिळाली तरच ही लोकसंख्यात्मक संधी आर्थिक व सामाजिक प्रगतीमध्ये रूपांतरित होऊ शकते. अन्यथा बेरोजगारी, अपुरी रोजगारक्षमता, आर्थिक असुरक्षितता आणि सामाजिक निराशा या समस्या निर्माण होऊ शकतात. म्हणूनच 'तरुण भारत' ही संकल्पना केवळ लोकसंख्येच्या आकडेवारीपुरती मर्यादित न राहता सक्षम, सुशिक्षित, कुशल, संवेदनशील आणि जबाबदार भारताच्या निर्मितीशी जोडली पाहिजे.

युवकांच्या विकासामध्ये शिक्षणाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. शिक्षण म्हणजे केवळ पदवी मिळविण्याचे साधन नव्हे, तर व्यक्तिमत्त्व विकास, विवेकशील विचार, वैज्ञानिक दृष्टिकोन, सामाजिक जाणीव आणि नैतिक मूल्यांची निर्मिती करणारी प्रक्रिया आहे. आजच्या बदलत्या जगात पारंपरिक ज्ञानाबरोबरच तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, माहिती-तंत्रज्ञान, संवादकौशल्य, समस्या सोडविण्याची क्षमता, सर्जनशीलता आणि उद्योजकता यांसारख्या कौशल्यांची गरज वाढत आहे. त्यामुळे युवकांना केवळ परीक्षाभिमुख शिक्षण देण्याऐवजी ज्ञान आणि कौशल्य यांचा समन्वय साधणारे शिक्षण देणे आवश्यक आहे. मातृभाषेतून गुणवत्तापूर्ण शिक्षण, उच्च शिक्षणाच्या समान संधी आणि ग्रामीण व वंचित विद्यार्थ्यांपर्यंत डिजिटल साधनांची उपलब्धता यांना विशेष महत्त्व द्यावे लागेल.

आजच्या युवकांसमोरील सर्वांत मोठ्या आव्हानांपैकी रोजगाराचे आव्हान महत्त्वाचे आहे. शिक्षण पूर्ण केल्यानंतरही अनेक तरुणांना त्यांच्या पात्रतेनुसार रोजगार मिळत नाही. काही युवकांना रोजगार मिळतो; परंतु त्यांना त्यांच्या कौशल्यांच्या तुलनेत कमी उत्पन्न किंवा अस्थिर रोजगार स्वीकारावा लागतो. ग्रामीण भागातील युवकांसाठी ही समस्या अधिक गंभीर आहे. शेतीवरील वाढता आर्थिक दबाव, मर्यादित औद्योगिक संधी आणि शहरांकडे होणारे स्थलांतर यामुळे ग्रामीण तरुणांसमोर अनेक प्रश्न उभे राहतात. त्यामुळे स्थानिक पातळीवर रोजगारनिर्मिती, कौशल्यविकास, कृषीपूरक व्यवसाय, लघुउद्योग, स्वयंरोजगार आणि सामाजिक उद्योजकतेला प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. प्रत्येक तरुणाने सरकारी नोकरीचीच अपेक्षा करण्याऐवजी रोजगार निर्माण करणारा उद्योजक होण्याची संधीही समाजाने उपलब्ध करून दिली पाहिजे.

डिजिटल क्रांतीने युवकांसमोर अभूतपूर्व संधी निर्माण केल्या आहेत. आज एका छोट्या गावातील युवकाला जगभरातील ज्ञानसंपदा काही क्षणांत उपलब्ध होऊ शकते. ऑनलाइन शिक्षण, डिजिटल सेवा, स्वतंत्र व्यवसाय, मुक्त व्यावसायिक काम, सर्जनशील उद्योग आणि नवउद्योजकता यामुळे तरुणांसाठी नवीन क्षेत्रे खुली झाली आहेत. परंतु डिजिटल साधनांचा वापर विवेकपूर्ण पद्धतीने करणेही तितकेच आवश्यक आहे. समाजमाध्यमांवरील चुकीची माहिती, अफवा, दिशाभूल करणारे संदेश, ऑनलाइन फसवणूक, अतिरेकी वापर आणि आभासी जगाचे वाढते आकर्षण यामुळे युवकांच्या विचारक्षमतेवर आणि सामाजिक संबंधांवर परिणाम होऊ शकतो. म्हणून डिजिटल साक्षरतेबरोबरच डिजिटल जबाबदारीची जाणीव निर्माण करणे आवश्यक आहे. तंत्रज्ञान हे साधन आहे; ते जीवनाचा पर्याय नाही, हे युवकांनी लक्षात ठेवले पाहिजे.

युवकांच्या सर्वांगीण विकासामध्ये मानसिक स्वास्थ्य आणि भावनिक सक्षमता यांनाही महत्त्वाचे स्थान आहे. स्पर्धेचे वाढते स्वरूप, शैक्षणिक अपेक्षा, रोजगाराची अनिश्चितता, आर्थिक दबाव, सामाजिक तुलना आणि समाजमाध्यमांमधून निर्माण होणारी कृत्रिम यशाची प्रतिमा यामुळे अनेक तरुणांवर मानसिक दबाव वाढत आहे. अपयशाला सामोरे जाण्याची क्षमता, स्वतःच्या भावनांची जाणीव, संवाद साधण्याची सवय आणि आवश्यकतेनुसार योग्य मदत घेण्याची सकारात्मक वृत्ती युवकांमध्ये विकसित करणे गरजेचे आहे. कुटुंब, शैक्षणिक संस्था आणि समाज यांनी युवकांच्या अडचणींकडे केवळ शिस्तीच्या किंवा यश-अयशाच्या चौकटीत न पाहता संवेदनशीलतेने पाहिले पाहिजे. मानसिकदृष्ट्या सक्षम युवकच आव्हानांचा सामना करून समाजाच्या विकासात प्रभावी योगदान देऊ शकतो.

युवक आणि सामाजिक परिवर्तन यांचे नाते अतूट आहे. इतिहासात अनेक सामाजिक परिवर्तनाच्या चळवळींमध्ये तरुणांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. स्वातंत्र्यलढ्यातील अनेक तरुण क्रांतिकारक, समाजसुधारक आणि विचारवंत यांनी देशासाठी मोठे योगदान दिले. महात्मा गांधी, स्वामी विवेकानंद, भगतसिंग, चंद्रशेखर आझाद, नेताजी सुभाषचंद्र बोस आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा अभ्यास केला असता तरुणाईच्या ऊर्जा आणि विचारशक्तीचे महत्त्व स्पष्ट होते. आजच्या काळातील युवकांनी इतिहासातील या प्रेरणांचा अर्थ केवळ गौरवकथांमध्ये शोधू नये, तर सामाजिक जबाबदारी, समानता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय या मूल्यांना आपल्या आचरणात स्थान द्यावे.

लोकशाहीच्या बळकटीकरणामध्ये युवकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. लोकशाही केवळ मतदान करण्यापुरती मर्यादित नसून प्रश्न विचारणे, सार्वजनिक धोरण समजून घेणे, सामाजिक समस्यांवर चर्चा करणे, कायद्याचा आदर करणे आणि सार्वजनिक हितासाठी सक्रिय सहभाग घेणे हीदेखील लोकशाहीचीच प्रक्रिया आहे. युवकांनी राजकीय आणि सामाजिक घडामोडींकडे चिकित्सक दृष्टीने पाहिले पाहिजे. जात, धर्म, भाषा, प्रदेश किंवा अफवांच्या आधारावर मतनिर्मिती करण्याऐवजी संविधानिक मूल्ये, विवेक, तथ्य आणि सार्वजनिक हित यांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. तरुण पिढीने लोकशाहीतील आपली भूमिका समजून घेतली, तर समाजातील ध्रुवीकरण कमी करून संवाद आणि सहकार्याची संस्कृती विकसित होऊ शकते.

भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला स्वातंत्र्य, समानता, न्याय आणि बंधुतेची मूल्ये दिली आहेत. युवकांनी या संविधानिक मूल्यांना केवळ पाठ्यपुस्तकातील विषय न मानता जीवनमूल्य म्हणून स्वीकारले पाहिजे. स्त्री-पुरुष समानता, सामाजिक न्याय, जातीय भेदभावाचा विरोध, वंचित घटकांबद्दल संवेदनशीलता, विविधतेचा आदर आणि मानवी प्रतिष्ठेचे संरक्षण या मूल्यांमधूनच आधुनिक भारताची निर्मिती होणार आहे. युवकांच्या विचारविश्वात वैज्ञानिक दृष्टिकोन आणि संविधानिक नैतिकता रुजविणे ही कुटुंब, शिक्षणसंस्था आणि समाजाची सामूहिक जबाबदारी आहे.


युवकांच्या सहभागाशिवाय पर्यावरण संरक्षणाचे उद्दिष्टही पूर्ण होऊ शकत नाही. हवामान बदल, जलसंकट, प्रदूषण, जंगलतोड आणि जैवविविधतेचा ऱ्हास या समस्या भविष्यातील पिढ्यांवर सर्वाधिक परिणाम करणार आहेत. त्यामुळे युवकांनी पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारणे, जलसंधारण, वृक्षसंवर्धन, कचरा व्यवस्थापन, ऊर्जा बचत आणि शाश्वत विकासाच्या उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेणे आवश्यक आहे. पर्यावरण संरक्षण ही केवळ शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. तरुणाईने पर्यावरणाच्या प्रश्नांकडे केवळ आंदोलनाच्या दृष्टीने न पाहता दैनंदिन जीवनातील सवयी बदलण्याच्या दृष्टीने पाहिले पाहिजे.

ग्रामीण युवकांकडे विशेष लक्ष देणे ही आजची गरज आहे. ग्रामीण भागातील तरुणांमध्ये क्षमता, श्रमशीलता आणि नवकल्पनाशक्ती मोठ्या प्रमाणात आहे; मात्र त्यांना संधींची कमतरता भासते. आधुनिक शेती, कृषीप्रक्रिया, दुग्धव्यवसाय, पर्यटन, हस्तकला, ग्रामीण उद्योग, डिजिटल सेवा आणि स्थानिक संसाधनांवर आधारित व्यवसाय यांच्या माध्यमातून ग्रामीण युवकांसाठी रोजगारनिर्मिती करता येऊ शकते. गावातील युवकांना गावातच गुणवत्तापूर्ण शिक्षण, कौशल्य प्रशिक्षण आणि उद्योजकतेच्या संधी मिळाल्या, तर ग्रामीण स्थलांतराचा दबाव कमी होऊ शकतो. ग्रामीण युवक हा केवळ रोजगाराचा शोध घेणारा घटक न राहता आपल्या गावाच्या विकासाचा नेतृत्वकर्ता बनू शकतो.

युवतींच्या सक्षमीकरणाशिवाय युवाशक्तीचा पूर्ण उपयोग होऊ शकत नाही. शिक्षण, रोजगार, सुरक्षितता, आरोग्य, डिजिटल प्रवेश, आर्थिक स्वावलंबन आणि निर्णयप्रक्रियेत समान सहभाग या संधी युवतींना मिळणे आवश्यक आहे. समाजाच्या प्रगतीमध्ये महिलांचे योगदान वाढवायचे असेल, तर मुलींच्या शिक्षणाला आणि त्यांच्या स्वावलंबनाला सर्वोच्च प्राधान्य द्यावे लागेल. ग्रामीण आणि वंचित पार्श्वभूमीतील युवतींसाठी विशेष कौशल्यविकास आणि रोजगाराच्या संधी निर्माण करणे गरजेचे आहे. महिला सक्षम झाल्या की कुटुंब, समाज आणि अर्थव्यवस्था या तिन्ही स्तरांवर सकारात्मक परिवर्तन घडते.

आजच्या युवकांसाठी मूल्याधिष्ठित नेतृत्वाची गरज आहे. नेतृत्व म्हणजे केवळ पद, अधिकार किंवा प्रसिद्धी नव्हे. नेतृत्व म्हणजे जबाबदारी स्वीकारणे, इतरांना सोबत घेणे, अडचणींवर उपाय शोधणे आणि सार्वजनिक हिताला प्राधान्य देणे. युवकांनी समाजमाध्यमांवरील प्रसिद्धीपेक्षा प्रत्यक्ष सामाजिक कार्याला महत्त्व दिले पाहिजे. रक्तदान, आपत्ती व्यवस्थापन, स्वच्छता, साक्षरता, पर्यावरण संरक्षण, ग्रामविकास, सामाजिक समता आणि नागरिक जनजागृती यांसारख्या उपक्रमांमध्ये तरुणांनी सहभाग घेतला तर समाजातील सकारात्मक शक्ती अधिक बळकट होईल.

युवकांनी स्वतःच्या अधिकारांबरोबरच कर्तव्यांचीही जाणीव ठेवणे आवश्यक आहे. देशाकडून संधी मिळाव्यात अशी अपेक्षा करताना देशासाठी आपले योगदान काय असू शकते, हा प्रश्नही प्रत्येक तरुणाने स्वतःला विचारला पाहिजे. प्रामाणिकपणे शिक्षण घेणे, कौशल्य आत्मसात करणे, कायद्याचा आदर करणे, सार्वजनिक संपत्तीचे संरक्षण करणे, पर्यावरणाची काळजी घेणे, सामाजिक सलोखा राखणे आणि गरजू व्यक्तींना मदत करणे ही राष्ट्रनिर्मितीचीच कामे आहेत. देशभक्ती केवळ घोषणांमध्ये नसून आपल्या दैनंदिन आचरणात दिसली पाहिजे.



आंतरराष्ट्रीय युवा दिनाच्या निमित्ताने शासन, शिक्षणसंस्था, उद्योग, स्वयंसेवी संस्था आणि समाज यांनी युवकांकडे अधिक विश्वासाने पाहण्याची गरज आहे. युवकांना केवळ समस्या म्हणून पाहण्याऐवजी ते समस्यांचे समाधान देऊ शकतात, असा दृष्टिकोन विकसित करावा लागेल. त्यांना निर्णयप्रक्रियेत स्थान, नवकल्पनांना प्रोत्साहन, संशोधनासाठी संधी, कौशल्यविकासासाठी साधने आणि उद्योजकतेसाठी आवश्यक आधार दिला पाहिजे. शहरी आणि ग्रामीण, श्रीमंत आणि गरीब, डिजिटल साधनांनी सक्षम आणि डिजिटल सुविधांपासून वंचित अशा युवकांमधील दरी कमी करण्यासाठीही ठोस प्रयत्न आवश्यक आहेत.

आज भारतासमोर विकसित आणि समताधिष्ठित राष्ट्र घडविण्याचे मोठे स्वप्न आहे. हे स्वप्न केवळ शासनाच्या योजनांनी पूर्ण होणार नाही. त्यासाठी जागरूक, कुशल, सर्जनशील आणि जबाबदार नागरिकांची आवश्यकता आहे. या परिवर्तनाच्या केंद्रस्थानी युवक असतील. भारताची युवा शक्ती जर ज्ञान, कौशल्य, विज्ञान, तंत्रज्ञान, सामाजिक बांधिलकी आणि संविधानिक मूल्यांशी जोडली गेली, तर देशाच्या विकासाला अभूतपूर्व गती मिळू शकते. मात्र त्यासाठी युवकांना संधी देण्याबरोबरच त्यांच्यावर विश्वास ठेवण्याचीही गरज आहे.

आंतरराष्ट्रीय युवा दिन हा त्यामुळे केवळ उत्सवाचा दिवस नसून आत्मपरीक्षणाचा दिवस आहे. आपण आपल्या युवकांना कोणत्या संधी देत आहोत, त्यांच्या प्रश्नांकडे किती गांभीर्याने पाहत आहोत आणि त्यांच्या स्वप्नांना किती व्यापक आकाश देत आहोत, याचा विचार करण्याची ही वेळ आहे. युवक ही राष्ट्राची केवळ भविष्यातील आशा नाही; ते वर्तमानातील परिवर्तनाचे सक्रिय शिल्पकार आहेत. त्यांच्या हातात ज्ञानाची शक्ती, विचारांची प्रगल्भता आणि तंत्रज्ञानाची साधने आहेत. या शक्तीला योग्य दिशा मिळाली, तर सामाजिक विषमता कमी करता येईल, आर्थिक विकासाला चालना देता येईल आणि लोकशाही अधिक सक्षम करता येईल.

म्हणूनच आजच्या युवा पिढीसमोर एकच संदेश असायला हवा तो म्हणजे स्वप्ने मोठी पाहा, परंतु त्यासाठी परिश्रम करण्याची तयारी ठेवा; तंत्रज्ञानाचा स्वीकार करा, परंतु विवेक सोडू नका; यशाचा पाठपुरावा करा, परंतु मूल्यांचा त्याग करू नका; स्वतःच्या प्रगतीचा विचार करा, परंतु समाजाची जबाबदारी विसरू नका. राष्ट्रनिर्मिती ही केवळ नेत्यांची किंवा शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक पिढीची सामूहिक जबाबदारी आहे. त्या जबाबदारीचे सर्वाधिक सामर्थ्यवान वाहक म्हणजे युवक. म्हणूनच सक्षम युवक, समताधिष्ठित समाज आणि विकसित भारत ही तीन उद्दिष्टे परस्परांपासून वेगळी नसून एकमेकांशी घट्ट जोडलेली आहेत. युवाशक्तीला योग्य दिशा, समान संधी आणि मूल्याधिष्ठित नेतृत्व मिळाले, तर भारताच्या उज्वल भविष्याचा मार्ग निश्चितच अधिक भक्कम होईल. आंतरराष्ट्रीय युवा दिनाच्या निमित्ताने हीच युवाशक्ती राष्ट्राच्या प्रगतीची नवी ऊर्जा ठरावी, हीच अपेक्षा.

**– डॉ. राजेंद्र बगाटे, (लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

**ईमेल** – bagate.rajendra5@gmail.com

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# समाजोपयोगी कार्याचा गौरव; सोलापूर जिल्हा युवा पुरस्कार २०२५-२६ जाहीर







**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर, (जिमाका): युवकांमधील सामाजिक बांधिलकी, नेतृत्वगुण आणि समाजोपयोगी कार्याला प्रोत्साहन देण्यासाठी देण्यात येणारा जिल्हा युवा पुरस्कार सन २०२५-२६ जाहीर करण्यात आला आहे. जिल्हा युवा पुरस्कार व युवा महोत्सव समिती, सोलापूरच्या बैठकीत सविस्तर छाननी, गुणांकन व चर्चे नंतर युवक, युवती आणि संस्था या तीन प्रवर्गातील पुरस्कारार्थींची सर्वानुमते निवड करण्यात आली.

**युवक प्रवर्ग :**

श्री. मुजम्मील खलील कमलीवाले, पंढरपूर, जि. सोलापूर यांची युवक प्रवर्गातून निवड करण्यात आली आहे. त्यांनी सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य, पर्यावरण तसेच मानवतावादी क्षेत्रात सातत्यपूर्ण कार्य केले आहे. गरजू व वंचित घटकांसाठी आरोग्य शिबिरे, रक्तदान जनजागृती, औषधे व जीवनावश्यक साहित्याचे वितरण, विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप, वृक्षारोपण आणि स्वच्छता अभियान अशा विविध उपक्रमांतून त्यांनी समाजसेवा केली आहे. युवकांना सामाजिक कार्याशी जोडण्याबरोबरच सामाजिक सलोखा व राष्ट्रीय एकात्मतेसाठी केलेल्या त्यांच्या बहुआयामी कार्याची दखल घेऊन ही निवड करण्यात आली आहे.

**युवती प्रवर्ग :**

डॉ. चंदाराणी अशोक क्षीरसागर, कुरुल, ता. मोहोळ, जि. सोलापूर यांची युवती प्रवर्गातून निवड करण्यात आली आहे. वैद्यकीय व्यवसायासोबत सामाजिक बांधिलकी जपत ग्रामीण व गरजू नागरिकांना आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याचे उल्लेखनीय कार्य त्यांनी केले आहे. आषाढी यात्रेच्या कालावधीत वारकऱ्यांसाठी आरोग्य तपासणी, औषधोपचार व औषध वितरणासह विविध आरोग्यविषयक उपक्रम त्यांनी राबविले. आरोग्य सेवा, जनजागृती, समाजसेवा आणि राष्ट्र उभारणीतील त्यांच्या योगदानाची दखल घेऊन त्यांची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

**संस्था प्रवर्ग :**

जाणता राजा बहुउद्देशीय शिक्षण प्रसारक मंडळ, कोंडी, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर यांची संस्था प्रवर्गातून निवड करण्यात आली आहे. संस्थेने शिक्षण, महिला सक्षमीकरण, समाजातील दुर्बल घटकांसाठी कार्य, आपत्ती व्यवस्थापन, क्रीडा, पर्यावरण, आरोग्य तसेच युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबविले आहेत. विविध समाजोपयोगी क्षेत्रांमध्ये सातत्याने केलेल्या बहुआयामी व व्यापक कार्याची दखल घेऊन संस्थेची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

दि. १५ ऑगस्ट २०२६ रोजी स्वातंत्र्य दिनी सोलापूर येथे पुरस्कार वितरण या पुरस्काराचे वितरण दि. १५ ऑगस्ट २०२६ रोजी स्वातंत्र्य दिनाच्या कार्यक्रमात सोलापूर येथे करण्यात येणार आहे.

जिल्ह्यातील युवक, युवती आणि समाजोपयोगी कार्य करणाऱ्या संस्थांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन त्यांना प्रोत्साहन देणे तसेच त्यांच्या कार्यातून इतर युवकांना प्रेरणा मिळावी, हा जिल्हा युवा पुरस्कारामागील प्रमुख उद्देश आहे. असे तालुका क्रीडा अधिकारी राहुल गायकवाड यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये कळविले आहे.

# यूपीएससीमध्ये हालहळ्ळीचा झेंडा! बसवराज चंद्रकांत स्वामी यांची AIR 279 सह घवघवीत यश

## जिद्द, गरिबीची जाणीव आणि प्रामाणिक प्रयत्नांचं फळ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

हालहळ्ळी (ता. अक्कलकोट, जि. सोलापूर) - आशिया खंडातील सर्वात लहान ग्रामपंचायत म्हणून ओळख असलेल्या हालहळ्ळी गावाने आज देशाच्या नकाशावर आपलं नाव सुवर्णाक्षरांनी कोरलं आहे. याच मातीतील सुपुत्र बसवराज चंद्रकांत स्वामी यांनी नुकत्याच जाहीर झालेल्या केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (UPSC) परीक्षेत अखिल भारतीय २७९ वा क्रमांक (AIR 279) पटकावून आयपीएस अधिकारी होण्याचा मान मिळवला आहे.

ही केवळ स्वामी परिवारासाठीच नव्हे, तर संपूर्ण हालहळ्ळी गाव, पंचक्रोशी आणि अक्कलकोट तालुक्यासाठी अभिमानास्पद आणि ऐतिहासिक क्षण आहे.

जिद्द, गरिबीची जाणीव आणि प्रामाणिक प्रयत्नांचं फळ

दरवर्षी देशभरातून सुमारे १० लाख विद्यार्थी या सर्वात कठीण परीक्षेसाठी बसतात, त्यातून केवळ २००० ते ३००० विद्यार्थी IS, IPS, IFS म्हणून निवडले जातात. अशा महासागरातून २७९ वा रँक मिळवणे हे असामान्य कर्तृत्व आहे. बसवराज यांनी आयपीएस (IPS) सेवा निवडली आहे.

त्यांच्या यशामागची कौटुंबिक पार्श्वभूमी प्रत्येकासाठी प्रेरणादायी आहे. सुमारे ५० वर्षांपूर्वी ज्या घरात कोणालाही स्वतःची सही देखील करता येत नव्हती, अशा कुटुंबात श्रीशैल स्वामी नावाचे एक व्यक्तिमत्व ग्रामसेवक म्हणून उदयास आले. त्यांनी शिक्षणाचे महत्त्व ओळखून संपूर्ण परिवाराला शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली आणि एका अशिक्षित कुटुंबाचे रूपांतर सुशिक्षित परिवारात केले. त्याचं मूर्तिमंत उदाहरण म्हणजे आज बसवराज यांनी मिळवलेलं हे यश होय. गरिबीची जाणीव ठेवून जिद्दीने आणि प्रामाणिक प्रयत्नांनी अत्युच्च शिखर गाठता येते, हे त्यांनी सिद्ध केले आहे.

बसवराज यांनी निवडलेल्या IPS मधील करिअर - अत्युच्च पद आणि बढतीच्या संधी

बसवराज स्वामी यांनी जी भारतीय पोलीस सेवा (IPS) निवडली आहे, त्यात बढतीची एक अत्यंत प्रतिष्ठेची आणि शिस्तबद्ध साखळी आहे.

एक IPS अधिकारी आपल्या करिअरची सुरुवात Assistant Superintendent of Police (ASP) म्हणून करतो आणि गुणवत्तेनुसार Director General of Police (DGP) या राज्यातील सर्वोच्च पदापर्यंत पोहोचू शकतो. याशिवाय केंद्र सरकारमध्ये प्रतिनियुक्तीवर (Central Deputation) गेल्यावर CBI संचालक, IB प्रमुख, RAW प्रमुख, NIA महासंचालक आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार यांसारख्या देशाच्या सर्वोच्च सुरक्षा पदांवरही IPS अधिकारी काम करू शकतो.



बसवराज यांच्या या यशाने हालहळ्ळीतील प्रत्येक तरुणाला स्वप्न पाहण्याचे आणि ते पूर्ण करण्याचे बळ मिळाले आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून देशसेवेच्या सर्वोच्च सेवेत झेप घेतलेल्या या तरुणाचा अभिमान करावा तितका कमीच आहे.

# पंढरपुरात श्री. नामदेव महाराज महासंजिवन समाधी सोहळा उत्साहात





श्री.संतश्रेष्ठ भक्त शिरोमणी नामदेव महाराज महासंजिवन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : श्री. नामदेव महाराज महासंजिवन समाधी सोहळा पंढरपूरात उत्साहात साजरा करण्यात आला या प्रसंगी श्री.संत कैकाडी महाराज व ह.भ.प.कोंडीराम काका,सद्गुरू ह.भ.प.रामदास महाराज जाधव यांचा पालखी सोहळा महाराष्ट्रातुन आलेल्या असंख्य भाविकांसमवेत संतश्रेष्ठ भक्त शिरोमणी नामदेव महाराज महासंजिवन समाधीश्री.विठ्ठल रुक्मिणी मंदिर महाद्वाराकडे नेण्यात आला. समाधी स्थळावर वारकरी भाविक भक्त, कीर्तनकार, प्रबोधनकार, सामाजिक, राजकीय, क्षेत्रातील सर्व उपस्थित राहुन समाधी स्थळावर आरती, भजन,पुजन,पंचपदी करुन पुष्पवृष्टी करण्यात आली.या प्रसंगी सर्व आलेल्या वारकरी भाविक भक्तांचे श्री.संत कैकाडी महाराज विश्वपुण्यधाम मंदिराचे ( अधिपती)ह.भ.प.भारत महाराज जाधव यांनी सर्वांचे आभार मानले. नंतर महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.





# वीरेंद्र परदेशी यांचे निधन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



बालाजी सोसायटी, कुमठा नाका, सोलापूर येथील रहिवासी तसेच फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखेचे कार्यक्रम अधिकारी वीरेंद्र वीरसिंह परदेशी यांचे वयाच्या ४५व्या वर्षी मंगळवार, दि. ११ ऑगस्ट २०२६ रोजी हृदयविकाराच्या झटक्याने दुःखद निधन झाले.

त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, आई, दोन बहिणी, एक भाऊ व भावजय असा परिवार आहे.

कै. वीरेंद्र परदेशी हे सामाजिक कार्यात सदैव अग्रेसर होते. सेवाभावी वृत्ती, मनमिळावू स्वभाव, मितभाषी व्यक्तिमत्त्व आणि सर्वसामान्यांना मदत करण्याची तत्परता यामुळे ते सर्वांच्या परिचयाचे आणि लाडके व्यक्तिमत्त्व बनले होते. त्यांच्या आपुलकीच्या, प्रेमळ आणि सहृदय स्वभावामुळे त्यांनी समाजात आपले विशेष स्थान निर्माण केले होते.

त्यांच्या आकस्मिक निधनाने कुटुंबीय, मित्रपरिवार, सहकारी तसेच सामाजिक क्षेत्रात शोककळा पसरली असून विविध स्तरांतून हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

कै. वीरेंद्र परदेशी यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

# खरोसा येथे श्री संत सावता महाराज पुण्यतिथी सोहळा साजरा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा प्रतिनिधी/अमर जाधव : सारणीकर : औसा तालुक्यातील खरोसा येथे गेल्या ५३ वर्षापासुन अविरतपणे दरवर्षी श्री संत सावता महाराज पुण्यतिथी सोहळा निमीत्त खरोसा येथील सावता महाराज मंदिरात अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा आयोजीत केला जातो.

खरोसा येथील अखंड हरिनाम सप्ताहात दैनंदिन काकडा. गाथा भजन, सावता चरित्र, ज्ञानेश्वरी पारायण, सह नामवंत ह भ प गहिनीनाथ महाराज औसेकर सह किर्तनकारांच्या सुश्राव्य किर्तनाचे आयोजन करण्यात आले होते. आज श्री संत सावता महाराज व विठ्ठल रुक्मीनी यांची विधीवत पुजा करुन संगीतमय वातावरणात शेकडो भाविकांनी काल्याच्या किर्तनाचा आनंद घेतला.

गेल्या ५३ वर्षापासून भक्ती भावाने श्री संत सावता महाराज यांची पुण्यतिथी खरोसा ग्रामस्थ साजरी करतात पुण्यतिथी साजरी करत असताना सात दिवसीय अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात येते. सात दिवस गावात प्रति पंढरपूर प्रमाणे भाविकांची गर्दी होते व भाविक या सप्ताहाचा मनसोक्त आनंद आनंद घेतात. ऐन आषाढी मध्ये येणाऱ्या या सप्ताहाला दरवर्षी पावसाची हजेरी असते व शेतकरी भाविक भक्त भर पावसात हा सप्ताह साजरा करतात पण यावर्षी पाऊस मनासारखा पडत नसल्याने शेतकरी हवालदील झाला असून संत सावता महाराज चरणी नतमस्तक होऊन

**ह.भ.प भुषण महाराज तळणीकर यांच्या सुश्राव्य वाणीतुन काल्याचे किर्तन संपन्न**

खरोसे करांनी भरभरून पाऊस होऊ दे व बळीराजा सुखी असुदे असं साकडं घातले यावेळी

यावेळी सप्ताह कमीटी मार्गदर्शक सदस्य व्यंकटराव राउतराव, सह, समस्थ भजनी मंडळ व खरोसा ग्रामस्थ उपस्थीत होते.

# तारापूर येथे दारु अड्ड्यावर छापा


**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : पंढरपूर विभागाचे सहायक पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे यांच्या आदेशानुसार तारापूर (ता.पंढरपूर) येथे पोलीसांनी

**सहायक पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे यांची कारवाई, दारूसाठ्यासह २२ हजार ९५० रुपयांचा मुद्देमाल जप्त**

टाकलेल्या छाप्यात अवैधरित्या देशी व विदेशी दारु विक्री करताना २१ हजार ५३० रुपये किमंतीच्या १६५ बॉटल मिळून आल्या तर रोख रक्कम १ हजार ४२० रुपये असे एकूण २२ हजार ९५० -रू चा मुद्देमाल मिळून आला आहे. याबाबत दत्ता किसन साबळे (वय ४२) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलीसांकडून मिळालेली माहिती अशी की, मंगळवार दि. ११ रोजी सहायक पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे यांना गोपनीय माहिती मिळाली. त्यानुसार कारवाई करण्यासाठी पथक पाठवण्यात आले. पोहेका रोंगे, पोका घायाळ हे तारापूर येथे पंढरपूर तारापूर रोड पत्रा शेडच्या शेजारी हिरव्या शेडनेटमध्ये गेले. तेव्हा, त्यांना दत्ता किसन साबळे रा. तारापूर हा देशी विदेशी कंपनीची दारू विकत असल्याचे मिळून आला. त्या ठिकाणी अधिक तपास केला असता पांढऱ्या पिशवीमध्ये देशी-विदेशी दारुच्या १६५ बॉटल मिळून आल्या. त्याची एकूण किंमत २१५३० रुपये इतकी आहे. तर



देशी विदेशी दारू विकून आलेली रोख रक्कम १४२० रुपये जप्त करण्यात आली. अशी एकूण २२९५० रू चा मुद्देमाल मिळून आला आहे. मुद्देमाल व आरोपी दतता साबळे यास पुढील कारवाई करिता पंढरपूर तालुका पोलीस ठाणे कडील महिला पोलीस हेड कॉन्स्टेबल सुरवसे यांच्या ताब्यात दिले आहे.

**भारतीय ट्रेड युनियन केंद्र अखिल भारतीय किसान सभा नाशिक जिल्हा यांची वतीने मोर्चाचे आयोजन**

# निफाड येथे आदिवासी बांधवांच्या वतीने मोर्चा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : भारतीय ट्रेड युनियन केंद्र (सेटू) अखिल भारतीय किसान सभा , यांचे अंतर्गत निफाड तालुक्यातील शेतकरी शेतमजूर ,वर्गाच्या वतीने निफाड येथील शिवाजी महाराज चौकात सोमवार दिनांक १० ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी अकरा वाजेच्या दरम्यान भव्य आदिवासी बांधवांचा मोर्चा काढण्यात आला होता, याप्रसंगी निफाड तालुक्यातील आदिवासी बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपल्या मागण्या पूर्ण करण्यासाठी एकजुटीचे दर्शन दिले याप्रसंगी माजी आमदार जे .पी गावित. यांचे मार्गदर्शनाखाली व कॉम्रेड डॉ. रामराव पार्धे, भाऊसाहेब सूर्यवंशी, ताई वाघ, नायब यांच्या नेतृत्वाखाली हा मोर्चा काढण्यात आला होता , याप्रसंगी नायब तहसीलदार राहुल मुळीक हे उपस्थित होते, याप्रसंगी मोर्चेकऱ्यांच्या वतीने खालील मागण्या मागण्यात आल्या *शेतीमालाला उत्पादन खर्च आधारित ५० टक्के नफा या सूत्रानुसार हमीभाव द्यावा , मागणी वन जमिनीच्या वाढीव क्षेत्रासह स्वतंत्र सातबारा तयार करा सर्व अपात्र वनदावे पात्र करा, गायरान, देवस्थान, इनामी जमिनी, सहकारी जमिनीवरील सर्व निवासी व शेतीचे अतिक्रमणे नियमित करा, किमान आधारभूत किंमत भात खरेदी योजनेच्या सन २०२५/ २६ या चालू आर्थिक वर्षातील बोनस रक्कम त्वरित शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग करा, स्मार्ट मीटर बंद करा गावठाण फिडरवरील लोड शेडिंग बंद करून २४ तास घरगुती लाईट सुरु करा , जिल्ह्यातील सर्व खराब रस्त्यांची चौकशी करून संबंधित ठेकेदार इंजिनियर यांच्यावर कडक कारवाई करा , वाढती महागाई व बेरोजगारी रोखा, नीट पेपर फुटीचे सखोल चौकशी करून. दोषींवर कडक कारवाई करावी, अंगणवाडी आशा गटप्रवर्तक शालेय पोषण आहार,राष्ट्रीय आरोग्य अभियान कर्मचारी इत्यादी योजना कर्मचाऱ्यांना कायम करा, आदी मागण्या यावेळी करण्यात आल्या,





याप्रसंगी वाळोबा ससाने, संतोष गायकवाड ,सोमनाथ बर्डे, रामनाथ गोधडे, मंगेश कडाळे, गोरख पवार ,नामदेव माळी ,माणिक राऊत, वैशाली सूर्यवंशी, भाऊसाहेब पवार, जयसिंग पवार, दत्तात्रय कांमडे, अनिल बाळू बर्डे, वाल्मीक माळी ,रंगनाथ कडाळे , दत्तात्रय रूखवद, आधी आदिवासी बांधव मोठ्या संख्येने यावेळेस उपस्थित होते याप्रसंगी निफाड पोलीस स्टेशनचे अभिजीत सोनवणे यांनी मोर्चा शांततेने पार पडावा म्हणून प्रयत्न केले .

# निफाड विधानसभा मतदारसंघात मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरिक्षणाचे गणना कार्य पूर्ण

## प्रारूप मतदार यादी दि.२४ ऑगस्ट रोजी प्रसिध्दीस; दि २३ सप्टेंबरपर्यंत दावे - हरकती दाखल करता येणार : प्रांताधिकारी डॉ. शशिकांत मंगरुळे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राबविण्यात येत असलेल्या मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत निफाड विधानसभा मतदारसंघातील गणना पत्रकांचे वाटप, संकलन व डिजिटायझेशनचे काम पूर्ण झाले आहे. प्रारूप मतदार यादी सोमवार, दि.२४ ऑगस्ट २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात येणार असून, त्यानंतर दि.२३ सप्टेंबर २०२६ पर्यंत नागरिकांना दावे व हरकती दाखल करता येणार आहेत. प्राप्त दावे - हरकतींवर सुनावणी व निर्णयाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर मंगळवार, दि.२७ ऑक्टोबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार आहे, अशी माहिती मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, निफाड डॉ. शशिकांत मंगरुळे यांनी दिली.



निफाड विधानसभा मतदारसंघाची २७८ मतदान केंद्रनिहाय मतदार यादी भागांमध्ये विभागणी करण्यात आली आहे. प्रारूपपूर्व स्थितीनुसार मतदारसंघात एकूण ३ लाख ३ हजार १३४ मतदार आहेत. या सर्व मतदारांसाठी गणना पत्रकांची छपाई व वाटप १०० टक्के पूर्ण करण्यात आले आहे. तसेच मतदारसंघातील सर्व २७८ मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांना विहित प्रशिक्षण देण्यात आले होते. दि.११ ऑगस्ट २०२६ अखेर उपलब्ध आकडेवारीनुसार, २ लाख ५४ हजार ६४१ मतदारांचे म्हणजेच ८४ टक्के मतदारांचे डिजिटायझेशन प्रणालीवर पूर्ण झाले आहे. डिजिटायझेशनसाठी प्रलंबित असलेल्या गणना पत्रकांची संख्या शून्य आहे. याशिवाय ७७५ मतदारांनी स्वतः ऑनलाइन पद्धतीने गणना पत्रके सादर केली आहेत. मतदारसंघातील ४८ हजार ४९३ गणना पत्रके म्हणजेच १६ टक्के गणना पत्रके विविध कारणांमुळे असंकलित राहिली आहेत. यामध्ये १० हजार २२२ मतदार मयत, ११ हजार ७२९ मतदार अनुपस्थित अथवा शोध घेऊनही न सापडलेले, तर २१ हजार ९६९ मतदार कायमस्वरूपी स्थलांतरित झाल्याचे निर्दशनास आले आहे. तसेच ४ हजार ६८५ मतदारांची नोंद अन्यत्र झालेली (दुबार) आढळून आली आहे. इतर कारणांमुळे ८८ गणना पत्रके असंकलित राहिली आहेत. याशिवाय ३ हजार ७४४ मतदारांबाबत (अनुपस्थित/स्थलांतरित/मयत) स्वरूपाच्या विसंगती निर्दशनास आल्या असून, त्यांची स्वतंत्रपणे क्षेत्रीय पडताळणी करण्यात येत आहे.

**दिनांक २४ ऑगस्टला प्रारूप मतदार यादी**

विशेष सखोल पुनरिक्षणाच्या पुढील कार्यक्रमानुसार दि.२४ ऑगस्ट २०२६ रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. ही यादी सर्व मतदान केंद्रांवर, तहसील कार्यालय व उपविभागीय अधिकारी कार्यालय, निफाड येथे तसेच भारत निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येणार आहे. दि. २४ ऑगस्ट ते दि. २३ सप्टेंबर २०२६ या कालावधीत नागरिकांना मतदार यादीसंदर्भात दावे व हरकती दाखल करता येतील. प्राप्त दावे व हरकतींवर विहित पद्धतीने सुनावणी घेऊन निर्णय झाल्यानंतर दि. २७ ऑक्टोबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

**नागरिकांनी मतदार यादी तपासण्याचे आवाहन**

येक नागरिकाने प्रारूप मतदार यादीत स्वतःचे तसेच कुटुंबातील सदस्यांचे नाव, पत्ता व इतर तपशील तपासून घेण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे. नाव नोंदणीसाठी नमुना क्रमांक ६, नाव वगळण्यासाठी अथवा हरकतीसाठी नमुना क्रमांक ७, तर मतदार यादीतील तपशिलातील दुरुस्तीसाठी नमुना क्रमांक ८ विहित कालावधीत सादर करता येणार आहे. अर्हता दिनांकास १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या पात्र तरुण-तरुणींनी मतदार म्हणून नोंदणी करून घ्यावी, असेही आवाहन करण्यात आले आहे. ज्या मतदारांचे गणना पत्रक असंकलित राहिले आहे, मात्र ते प्रत्यक्षात संबंधित मतदान केंद्राच्या क्षेत्रात वास्तव्यास आहेत, अशा मतदारांनी तातडीने आपल्या बी.एल.ओ अथवा तहसील कार्यालयाशी संपर्क साधावा, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

अर्ज ऑनलाइन पद्धतीने ECINet मोबाईल अॅप किंवा भारत निवडणूक आयोगाच्या voters.eci.gov.in संकेतस्थळावर सादर करता येतील. अधिक माहितीसाठी मतदार मदत क्रमांक १९५० वर संपर्क साधता येणार आहे. तसेच सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांनी प्रत्येक मतदान केंद्रासाठी मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधी नियुक्त करून दावे व हरकतींच्या प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. मॅपिंग न झालेल्या मतदारांची नावे केवळ त्याच कारणाने वगळली जाणार नाहीत

सन २००२ सालच्या मतदार यादीशी मॅपिंग न झालेले म्हणून वर्गीकृत झालेल्या कोणत्याही मतदाराचे नाव केवळ त्या नोंदीच्या आधारे मतदार यादीतून वगळण्यात येणार नाही, अशी महत्त्वाची सूचना प्रशासनाने दिली आहे. लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५० आणि मतदार नोंदणी नियम, १९६० मधील तरतुदींनुसार संबंधित मतदारांना विहित नोटीस देऊन तसेच सुनावणीची योग्य संधी दिल्यानंतरच सक्षम प्राधिकाऱ्याकडून पुढील कार्यवाही केली जाणार आहे. त्यामुळे नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, मतदार यादी अचूक, अद्ययावत आणि सर्वसमावेशक करण्यासाठी सर्व नागरिक, लोकप्रतिनिधी, राजकीय पक्ष, स्वयंसेवी संस्था आणि प्रसारमाध्यमांनी सहकार्य करावे, असे आवाहन मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी डॉ. शशिकांत मंगरुळे यांनी केले आहे.

# पंढरपूर येथे अप्पर पोलीस अधीक्षक कार्यालय मंजूर : अप्पर पोलीस अधीक्षकपदी प्रेरणा कट्टे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : तीर्थक्षेत्र पंढरपूर इथे अप्पर पोलीस अधीक्षक कार्यालय मंजूर झाल्यानंतर या महत्त्वाच्या पदावर दबंग आणि कर्तव्यदक्ष पोलीस अधिकारी म्हणून प्रेरणा कट्टे, यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे पंढरपूर शहरांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

गुन्हेगारीला आळा घालण्यासह, महिला सुरक्षेची नवी दिशा मिळेल अशी ही अपेक्षा होत आहे.

नवी मुंबई क्राइम यांची यशस्वी नेतृत्व नवी मुंबईच्या पहिल्या महिला सहाय्यक पोलीस आयुक्त (क्राईम ब्रँच) गुन्हेगारी मुक्त करण्यासाठी विशेष मोहीम राबवली.

किशोर आवारे हत्या प्रकरण SIT प्रमुख



पुणे विभागात गाजलेल्या किशोर आवारे हत्या प्रकरणाचा तपास विशेष तपास पथकाच्या प्रमुख म्हणून यशस्वीरित्या पूर्ण केला.

साताऱ्यातील अत्याचार प्रकरण पिढीताना न्याय

बंद बालिका आश्रम शाळेतील अत्याचाराच्या गंभीर प्रकरणाचा तपास पूर्ण करून पिढी त्यांना न्याय मिळवून दिला.

महिला सुरक्षा व सक्षम करण्यासाठी विशेष उपक्रम

महिला सुरक्षा व निर्भय पथक आणि सचिन करण्यासाठी नावीन्यपूर्ण उपक्रम राबवले.

लेडी सिंघमम्हणून ओळख निर्माण केलेल्या प्रेरणा कट्टे यांच्या पंढरपुरातील कारकीर्दीकडे आता संपूर्ण तालुक्याची लक्ष लागले आहे.

# शहरात सार्वजनिक ठिकाणी अतिक्रमण करु नये

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांच्या आदेशान्वये आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ आणि महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम, १९६५ मधील तरतुदीच्या अधिन राहुन पंढरपूर शहरातील सार्वजनिक रस्ते, फुटपाथ तसेच नगर परिषदेच्या मोकळ्या जागे वरील अतिक्रमणे विशेष अतिक्रमण निर्मूलन पथकाद्वारे काढण्यात आलेली आहेत. सदर ठिकाणी पुन्हा अतिक्रमण केल्यास कोणतीही पुर्व सूचना न देता अतिक्रमण काढण्यात येईल अशा सूचना मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी दिल्या.

आषाढी यात्रा कालावधहीत वारकरी भाविकांना तेसच नागरिकांना वाहतुकीचा

**मुख्याधिकारी महेश रोकडे यांच्या सूचना**

कोणताही अडथळा येऊ नये यासाठी पंढरपूर शहरात अतिक्रमण मोहिम राबविण्यात आली होती. आषाढी वारीनंतर शहरातील ज्या ठिकाणावरील अतिक्रमणे पथकाद्वारे काढून टाकण्यात आलेली आहेत व सदरची जागा अतिक्रमण मुक्त केलेली आहे. अशा ठिकाणी परत अतिक्रमण धारकांकडून नव्याने व्यवसायासाठी खोकी व कायम स्वरूपी शेड टाकून अतिक्रमण करणेत येत असल्याचे दिसून येत आहे.शहरातील सार्वजनिक रस्त्यावर, फुटपाथवर, न.प. जागेवर नव्याने अतिक्रमण करणाऱ्यांना सूचित करण्यात येते की, आपले अतिक्रमण पंढरपूर नगरपरिषदेमार्फत कोणतीही सूचना न देता पोलीस बंदोबस्तात विशेष अतिक्रमण पथकाद्वारे काढून घेण्यात येईल व या दरम्यान होणाऱ्या नुकसानीस नगरपरिषद जबाबदार असणार नाही. ती संबधितांची वैयक्तिक जबाबदारी राहणार आहे.

तसेच कारवाई दरम्यान सार्वजनिक सुरक्षिततेस बाधा आणलेस अथवा सदर प्रकरणी सरकारी कामात अडथळा निर्माण केल्यास संबंधितांवर आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ अन्वये कायदेशीर कारवाई करणेत येईल. तरी पंढरपूर शहर अतिक्रमण मुक्त व सुरक्षित ठेवून सर्व नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे व आपले अतिक्रमण स्वतःहून काढून घ्यावे, असे आवाहनही मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी केले आहे.

# एक राखी सैनिकांसाठी उपक्रम पंचक येथे उत्साहात संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : सकल मराठा परिवार फाउंडेशन आयोजित एक राखी सैनिकांसाठी हा राष्ट्रप्रेम जागविणारा उपक्रम

मनपा शाळा क्र. ४९ आणि जनता विद्यालय पंचक येथे उत्साहात संपन्न झाला,येथील विद्यार्थ्यांनी आपल्या देशाच्या वीर जवानांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी स्वहस्ते सुंदर राख्या, ग्रीटिंग कार्ड्स आणि मनापासून शुभेच्छा संदेश तयार करून मोठ्या उत्साहाने जमा केले. पावसाच्या रिमझिम सरी सुरू असतानाही विद्यार्थ्यांचा उत्साह तूसभरही कमी झाला नाही. राष्ट्रप्रेमाची ही सुंदर भावना प्रत्येक विद्यार्थ्याच्या सहभागातून उपस्थितांना



अनुभवायला मिळाली.

*यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्रभाग क्रमांक १८ च्या नगरसेविका सौ.सुनिताताई सागर भोजने उपस्थित होत्या त्यानी सकल मराठा परिवाराच्या सामाजिक कार्याचे कौतुक करत भविष्यातही असेच समाजहिताचे उपक्रम सातत्याने राबवावेत आशा अपेक्षा व्यक्त केल्या. मुख्याध्यापक दत्तात्रय सूर्यवंशी आणि जनता विद्यालय मुख्याध्यापिका व्ही. एन. रायते यांनी विद्यार्थ्यांना या उपक्रमाचे महत्त्व समजावून सांगत सर्व सहभागींचे आभार मानले. .प्रकाशभाऊ बोराडे यांनी सकल मराठा परिवाराच्या विविध सामाजिक उपक्रमांची माहिती देऊन शाळेचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले..निर्मला गायकवाड यांनी सूत्रसंचालन केले.

या प्रसंगी केंद्र प्रमुख गोपाल बैरागी व तसेच सकल मराठा परिवाराचे खंडूभाऊ आहेर, प्रकाश बोराडे, स्नेहलताई काळे, सिंधुताई पगार,प्रविण देशमुख, अॅड. गौरव मोहिते, संजय झाराळे, चेतन लोखंडे, मोहिनीताई रावं, संगीताताई पाटील, संजय गोराडे, योगेश वरखेडे, कल्पेश बोराडे, योगेश मुळाने आणि शाळेचे शिक्षकवृंद निर्मला गायकवाड,वैशाली ठोक, सुनंदा कर्डिले, पद्मा उगले, रेखा विसपुते, योगिनी गायकवाड, प्रतिभा भुसारी, तसेच जनता विद्यालयच्या सौ.बोरसे, रवींद्र बच्छाव, सौ.खैरनार, सौ.दिपाली मेगाने, योगेश पगार,.शिवाजी झाडे, सौ. वर्षा पवार, रमेश थेटे,सोमनाथ सहाणे, सौ. माधुरी जगताप, प्राजक्ता सोनवणे आदी शिक्षकवृंद उपस्थित होते.

# महाराष्ट्रावर पाऊस रुसला! श्रावण उजाडतोय तरी पुढच्या पाच दिवसांचा अंदाज अनपेक्षित

पुणे : राज्यात जवळपास आठ दिवसांपासून पावसाने उसंत घेतली आहे. त्यामुळे सर्वाधिक पाऊस पडलेल्या भागांना दिलासा मिळाला असला तरी राज्यातील बहुसंख्य भाग पावसाने अद्यापही वंचित आहेत. अनेक जिल्ह्यांमध्ये पावसाची तूट बघायला मिळत आहे. त्यामुळे नागरिक पावसाची वाट बघत आहेत. राज्यात पाऊस कधी परतणार किंवा पुढच्या पाच दिवसांत पावसाचा अंदाज काय असेल? याबाबत पुणे हवामान विभागाचे तज्ज्ञ एस डी सानप यांनी महत्त्वाची माहिती दिली आहे.

पुणे जिल्ह्यात घाट माथ्यावर आणि विविध भागांमध्ये खूपच हलक्या स्वरुपाचा पाऊस पडत आहे. ५ मिमी पेक्षाही कमी पावसाची नोंद विविध ठिकाणी होत आहे. घाट माथ्यावर हलक्या ते मध्यम स्वरुपाचा पावसाची नोंद गेल्या २४ तासात झालेली आहे. येणाऱ्या काही दिवसांमध्ये हलक्या स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे. किंवा काही ठिकाणी उघडीप देखील दिसून येईल, अशी माहिती एस डी सानप यांनी दिली.

पुढच्या पाच दिवसांमध्ये सर्वदूर पावसाची शक्यता नाही किंवा मुसळधार पावसाची शक्यता नाही. पावसाचे प्रमाण मध्यम स्वरुपाचे असेल किंवा तुरळक ठिकाणी पाऊस पडू शकतो. त्यामुळे तूट भरुन निघण्याची शक्यता कमी आहे. पण हलक्या स्वरुपाचा पाऊस तूरळक ठिकाणी पडू शकतो. आता कोणतीही सिस्टीम म्हणजेच कमी दाबाचे क्षेत्र किंवा मान्सूनचे वारे सक्रीय आहेत, अशी परिस्थिती नाही, असं हवामान तज्ज्ञ सानप यांनी सांगितलं. कमी दाबाचे क्षेत्र आहे, पण ते बंगालच्या उपसागराच्या उत्तरेच्या दिशेला निर्माण झालेलं आहे. त्याचा परिणाम हा उडिसा, पश्चिम बंगाल, झारखंड या भागांमध्ये होत आहे. आपल्याकडे पुढच्या चार ते पाच दिवसांत तरी त्याचा परिणाम होणार नाही. अजून काही हवामान बदल झाले तर कळवले जाईल, अशी माहिती त्यांनी दिली.

**ग्रामपंचायतीला राज्यस्तरीय 'आदिशक्ती पुरस्कार' जाहीर**

**गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा ; पुरस्कारामुळे ग्रामस्थांचा उत्साह शिगेला**

# ना. चिंचोली गावच्या महिला सक्षमीकरण मॉडेलची राज्य शासनाकडून दखल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर तालुक्यातील ग्रामपंचायत नारायण चिंचोलीने महिला सक्षमीकरण, बालकल्याण, लोकसहभाग आणि सर्वांगीण ग्रामविकासाच्या क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत महाराष्ट्र शासनाच्या महिला व बालविकास विभागामार्फत दिला जाणारा प्रतिष्ठेचा 'आदिशक्ती पुरस्कार' जाहीर करण्यात आला आहे. या पुरस्कारामध्ये सोलापूर जिल्हास्तरावर तृतीय क्रमांक मिळाल्याने संपूर्ण गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

राज्य शासनाने महिलांच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक आणि आरोग्यविषयक विकासासाठी उत्कृष्ट कार्य करणाऱ्या ग्रामपंचायतींचा गौरव करण्यासाठी हा पुरस्कार जाहीर केला आहे. शासनाच्या निर्णयानुसार महिला सक्षमीकरण, बालकल्याण, शासन योजनांची प्रभावी अंमलबजावणी, ग्रामस्थांचा सहभाग आणि सर्वसमावेशक विकास या निकषांवर ग्रामपंचायतींची निवड करण्यात आली. या सर्व निकषांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केल्यामुळे नारायण चिंचोली ग्रामपंचायतीची निवड झाली आहे.

ग्रामपंचायतीने गेल्या काही वर्षांत महिलांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देणे, महिला बचत गटांना सक्षम करणे, पोषण अभियान, स्वच्छता अभियान, बालकांच्या आरोग्य व शिक्षणासाठी विविध उपक्रम राबविणे, महिलांचा ग्रामसभेतील सहभाग वाढविणे, सामाजिक जनजागृती, आरोग्य तपासणी शिबिरे आणि स्वावलंबनाकडे वाटचाल घडवून आणण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले. या सर्व उपक्रमांची राज्य शासनाने दखल घेत हा सन्मान जाहीर केला आहे.

> **हा सन्मान संपूर्ण गावाच्या एकजुटीचा**
>
> 
>
> **आदिशक्ती पुरस्कार हा माझा वैयक्तिक सन्मान नसून संपूर्ण नारायण चिंचोली गावाचा गौरव आहे. ग्रामस्थांनी ग्रामपंचायतीवर दाखविलेला विश्वास, सर्व ग्रामपंचायत सदस्य, उपसरपंच गहिनीनाथ चव्हाण, ग्राम प्रशासन अधिकारी संतोष गायकवाड, अधिकारी-कर्मचारी, महिला बचत गट आणि प्रत्येक ग्रामस्थाच्या सहकार्यामुळेच हा मान मिळाला आहे. भविष्यातही महिला सक्षमीकरण, बालकल्याण आणि गावाच्या सर्वांगीण विकासासाठी अधिक जोमाने कार्य करत राहू.**
>
> **- सौ. नर्मदाताई लक्ष्मण धनवडे**
> **सरपंच, ग्रामपंचायत नारायण चिंचोली**

या यशामागे सरपंच सौ. नर्मदाताई लक्ष्मण धनवडे यांचे प्रभावी नेतृत्व, ग्रामपंचायत सदस्यांचे सहकार्य, ग्रामस्थांचा सक्रिय सहभाग आणि ग्रामप्रशासनाची कार्यक्षम अंमलबजावणी महत्त्वाची ठरली. ग्रामपंचायतीने विकासकामांमध्ये पारदर्शकता, लोकसहभाग आणि नियोजनबद्ध काम काज यावर भर देत गावाला विकासाच्या नव्या उंचीवर नेण्याचा प्रयत्न केला.

ग्रामपंचायतीचे मार्गदर्शक माजी आमदार प्रशांत परिचारक तसेच पांडुरंग सहकारी साखर कारखान्याचे संचालक लक्ष्मण (तात्या) धनवडे यांच्या मार्गदर्शनाखाली गावात रस्ते, स्वच्छता, पिण्याचे पाणी, सार्वजनिक सुविधा, महिला व बालविकास आणि विविध शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात आली. यामुळे नारायण चिंचोलीची ओळख आदर्श आणि प्रगत गाव म्हणून निर्माण झाली आहे.

राज्य शासनाकडून पुरस्कार जाहीर होताच गावात आनंदाचे वातावरण पसरले असून ग्रामस्थांनी सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, अधिकारी-कर्मचारी आणि महिला बचत गटांच्या कार्यकर्त्यांचे अभिनंदन केले. हा पुरस्कार गावाच्या विकासाच्या वाटचालीला नवी ऊर्जा देणारा ठरणार असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

महिला व बालविकास विभागाच्या निकषांनुसार उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ग्राम पंचायतींमध्ये नारायण चिंचोलीने आपले वेगळे स्थान निर्माण केले असून, भविष्यातही महिला सक्षमीकरण, बालकल्याण आणि सर्वांगीण ग्राम विकासासाठी अधिक व्यापक स्वरूपात उपक्रम राबविण्याचा निर्धार ग्रामपंचायतीने व्यक्त केला आहे.